# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

**क्र. मुमाआ/नों.क्र.४४४१/२२/अ.क्र.८९५०/२५/०१**

**श्री. शेख नईम शेख लाल**
नविन पाण्याच्या टाकीजवळ,
पलटन, हिंगोली, ता.जि. हिंगोली

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (का.४)**
अल्पसंख्याक विकास विभाग,
दालन क्र. ७१४, ७वा मजला, मंत्रालय (विस्तार)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई – ४०००३२.

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा अवर सचिव (का.४)**
अल्पसंख्याक विकास विभाग,
दालन क्र. ७१४, ७वा मजला, मंत्रालय (विस्तार)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई – ४०००३२.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १७.१२.२०२५**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | उपस्थित |

आज सुनावणीच्या वेळी अपीलार्थी व विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, (का.४) अल्पसंख्याक विकास विभाग अनुपस्थित आहे. विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी तथा अवर सचिव (का.४) अल्पसंख्याक विकास विभाग, श्री. सारंगकुमार पाटील उपस्थित आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अपीलार्थी यांनी दि. १५.०४.२०२२ रोजीच्या जोडपत्र-अ नुसार "राज्यातील वक्फ मिळकतीसंबंधित अफरातफर व अनियमीततेच्या प्रकरणात मा. न्यायाधिश ए.टी.ए.के.शेख यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी आयोगाची नेमणुक करण्यात आली होती. त्या आयोगाने आपला चौकशी अहवाल सन २०१५ मध्ये शासनास सादर केलेला आहे. तक्रार क्रमांक ७०/२००९ मसजीद पलटन आणि मदरसा अंजुमन इस्लामिया हिंगोली या संदर्भात पृ.क्र. ३६९ व ३७० वर अहवाल सादर करण्यात आला आहे. या अहवालाच्या अनुषंगाने शासनाद्वारे या प्रकरणात काय कारवाई करण्यात आली. त्या कारवाई अहवालाची व शासन आदेशाची प्रत देण्यात यावी" याबाबत माहितीची मागणी केली आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (का.४) अल्पसंख्याक विकास विभाग यांनी दि. २२.०४.२०२२ रोजी "सदर अर्जामध्ये

उल्लेखित प्रकरणी यापूर्वीच कार्यवाही करण्यात आली असून प्रस्तुत प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांना कार्यवाही करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. सदर माहितीची एकूण तीन पृष्ठे सोबत जोडून पाठविण्यात येत आहे", असे उत्तरान्वये कळविण्यात आले आहे. मात्र विहीत मुदतीत माहिती प्राप्त झाली नसल्याचा आक्षेप नमूद करीत अपीलार्थी यांनी दि. १३.०६.२०२२ रोजी प्रथम अपील अर्ज दाखल केला आहे. त्यावर दि. २२.०७.२०२२ रोजी सुनावणी आयोजित केली होती. त्यास अनुसरुन दि. ०३.०८.२०२२ अन्वये पुढीलप्रमाणे आदेश पारित केले आहेत :- "जन माहिती अधिकाऱ्यांचे अपीलार्थीस पत्राची प्रत ई-मेल किंवा स्पीड पोस्टाने पाठविण्यात यावी", या निर्देशासह प्रथम अपील अर्ज निकाली काढण्यात आला आहे. प्रस्तुत प्रकरणी अपीलार्थी यांनी दि. ३०.०९.२०२२ रोजी द्वितीय अपील अर्ज दाखल केला असून माहिती विनामुल्य देण्याचा तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्या विरुध्द कलम २० (१) व २० (२) दफतर दिरंगाई कायदाच्या कलम १० (१) भंग झाल्याचा आरोप करीत १० (२) १० (३) तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या तरतुदीनुसार शिस्तभंगाची कार्यवाही करुन नोंद त्यांच्या सेवापुस्तकात घेण्यात यावी अशी विनंती केली आहे.

आजच्या सुनावणीस अपीलार्थी अनुपस्थित आहे. तथापि विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (का.४) अल्पसंख्याक विकास विभाग व विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी तथा अवर सचिव (का.४) अल्पसंख्याक विकास विभाग यांनी सादर केलेल्या खुलासाचे अवलोकन केले असता, अपीलार्थी यांना विहीत मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी प्रतीसाद दिला असून दि. ०९.०४.२०१५ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांना पाठविण्यात आलेली अहवालाची प्रत व अपीलार्थी यांना अपेक्षित असलेला अहवाल सादर केला असून त्या अहवालाची प्रत अपीलार्थी यांना प्रदान केला आहे. ही बाब लक्षात घेता, अपीलार्थी यांनी मा. न्यायमूर्ती ए.टी.ए.के.शेख यांनी चौकशी आयोगाच्या अहवालातील त्यांनी विचारणा केलेल्या मालमत्ता संदर्भात या आधीच जन माहिती अधिकारी यांच्या स्तरावर व प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या निर्देशानुसार माहिती प्रदान केली असल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता, प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे. मात्र असे करीत असताना अल्पसंख्याक विकास विभाग यांनी मा. न्यायमूर्ती ए.टी.ए.के.शेख सेवानिृवत जिल्हा व सत्र न्यायाधिश यांनी महाराष्ट्र राज्यातील वक्फ मालमत्ता, मिळकती संबंधित अफरातफर व अनियमीततेच्या संदर्भात शासनास सादर केलेला महाराष्ट्र विधान मंडळाच्या दोन्ही सभागृहात या आधीच पटलावर ठेवण्यात आलेल्या अहवालाची प्रत तसेच त्यावर करण्यात आलेल्या कृती अहवालाची प्रत स्वत:च्या संकेतस्थळावर पारदर्शक्तेच्या व व्यापक जनहिताच्या दृष्टीने उपलब्ध करुन देण्याच्या निर्देशानुसार प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबंद करण्यात येत आहे.

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**

**२. अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Maharashtra

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १७.१२.२०२५**